नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

| वर्ष - ३ रे<br>Year - 3rd | अंक - १७०<br>Issue - 170 | वार रविवार दि. ९ नोव्हेंबर २०२५<br>Blow- Sunday Date 9 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# संसदेचे हिवाळी अधिवेशन

## एसआयआर, मतचोरीचा मुद्दा तापणार; १ ते १९ डिसेंबरदरम्यान चालणार अधिवेशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केंद्र सरकारच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. त्यानुसार संसदेचं हिवाळी अधिवेशन १ डिसेंबर ते १९ डिसेंबर या कालावधीत होईल. संसदीय कामांची आवश्यकता पाहून हा अवधी वाढवला किंवा कमी केला जाऊ शकतो. केंद्रीय संसदीय कार्य मंत्री किरण रिजिजू यांनी याबद्दलची माहिती दिली.



किरण रिजिजू यांनी एक्सवर पोस्ट केली आहे. 'राष्ट्रपती महोदयांनी सरकारचा प्रस्ताव स्वीकारला आहे. संसदेचं हिवाळी अधिवेशन १ डिसेंबर ते १९ डिसेंबर या कालावधीत होईल. हे अधिवेशन सार्थकी लागेल, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे लोकशाही मजबूत होईल आणि जनतेच्या आकांक्षा पूर्ण होतील,' असं रिजिजू यांनी पोस्टमध्ये नमूद केलं आहे.

संसदेच्या होऊ घातलेल्या अधिवेशनाचा कालावधी अन्य अधिवेशनांपेक्षा कमी असेल. या अधिवेशनात बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालांचे पडसाद उमटताना दिसतील. देशातील १२ राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये निवडणूक आयोगानं विशेष सखोल फेरनिरीक्षण सुरु केलं आहे. त्याला विरोधी पक्षांकडून विरोध सुरु आहे. मतदार यादीतील अनेक घोळ समोर आले आहेत. या संदर्भात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गेल्या तीन महिन्यांत तीन पत्रकार परिषदा घेत पुराव्यांसह मतचोरीचे आरोप केले आहेत. त्यामुळे आता हा विषय संसदेत गाजण्याची दाट शक्यता आहे.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सरकार अनेक महत्त्वाची विधेयकं मंजूर करण्याचा प्रयत्न करेल. घटनेत १२९ वी, १३० वी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडलं जाईल. त्यासोबतच जन विश्वास विधेयक, दिवाळखोरी विधेयकही संसदेत आणण्यात येईल. याआधी २०१३ मध्ये संसदेचं सर्वात लहान हिवाळी अधिवेशन झालं होतं. ५ ते १८ डिसेंबर या कालावधीत अधिवेशन संपन्न झालं होतं. केवळ १४ दिवसांच्या अधिवेशनात ११ बैठका झाल्या होत्या.

यंदाच्या हिवाळी अधिवेशनात बरीच वादळी चर्चा होण्याची शक्यता आहे. इंडिया ब्लॉकमधील पक्षांनी एसआयआरवरुन रान पेटवलं आहे. त्याचे पडसाद आता संसदेत उमटू शकतात. यावरुन विरोधक सत्ताधाऱ्यांची कोंडी करण्याची शक्यता आहे. संसदेच्या गेल्या अधिवेशनात लोकसभा, राज्यसभेत जोरदार संघर्ष पाहायला मिळाला होता.

# मनोज जरांगेंना मुंबई पोलिसांचं समन्स

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : काही महिन्यांपूर्वी मराठा आरक्षणासाठी आझाद मैदानावर आंदोलन करणारे आंदोलन मनोज जरांगे यांना मुंबई पोलिसांनी चौकशीसाठी समन्स बजावले आहे .येत्या १० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता त्यांना आझाद मैदान पोलीस ठाण्यात हजर राहण्याच्या सूचना करण्यात आल्यात . मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी २ सप्टेंबरला आजाद मैदानात आमरण उपोषण केलं होतं .परवानगी नसताना आंदोलन केल्याप्रकरणी जरांगे पाटलांसह इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता .



मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील सध्या चर्चेत आहेत राष्ट्रवादीचे आमदार धनंजय मुंडे यांच्यावर केलेल्या गंभीर आरोपांमुळे. धनंजय मुंडे यांच्या सांगण्यावरूनच माझ्या हत्येचा कट रचण्यात आल्याचं जरांगे पाटलांनी म्हटल्यानंतर राज्यभर खळबळ उडाली. दुसरीकडे, काही महिन्यांपूर्वी मुंबईतील आझाद मैदानात मनोज जरांगे पाटलांनी मराठा आरक्षणासाठी आंदोलन केलं होतं. या आंदोलनामुळे सध्या जरांगे पाटील अडचणीत आले आहेत. मराठा आरक्षणासाठी आझाद मैदानावर आंदोलन करणारे मनोज जरांगे यांच्या अडचणीत वाढ झाली आहे .मनोज जरांगे पाटील यांना मुंबई पोलिसांनी चौकशीसाठी समन्स बजावला आहे .येता १० नोव्हेंबरला सकाळी ११ वाजता त्यांना आझाद मैदान पोलीस ठाण्यात हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत . या प्रकरणात पांडुरंग तारक, गंगाधर कालकुटे, चंद्रकांत भोसले, वीरेंद्र पवार आणि प्रशांत सावंत या चार जणांनाही समन्स पाठवण्यात आले आहेत . पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ सप्टेंबर रोजी मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषण सुरू केले होते .या आंदोलनासाठी कोणतेही अधिकृत परवानगी न घेतल्याचा आरोप करत पोलिसांनी आझाद मैदान पोलीस ठाण्यात मनोज जरांगे पाटील आणि इतर सहकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला होता .या पार्श्वभूमीवर आता पोलिसांनी सर्वांना चौकशीसाठी उपस्थित राहण्यास सांगितले असून या चौकशीला मनोज जरांगे पाटील उपस्थित राहतात का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .मराठा आरक्षणासाठी राज्यभर आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे पाटील गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत आहेत . सध्या मनोज जरांगे पाटील आणि धनंजय मुंडे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करताना दिसत आहेत .

# राज्यातील 'या' सर्व जमीन व्यवहारांची श्वेतपत्रिका काढा; हर्षवर्धन सपकाळ यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सत्ताधारी पक्षातील नेत्यांनी व त्यांच्या नातेवाइकांनी राज्य लुटण्याचा सपाटा लावला आहे. मुंबई, पुण्यासह राज्यात कोट्यवधींचे भूखंड कवडीमोल भावाने लाटले जात आहेत. या सर्व जमीन व्यवहारांची श्वेतपत्रिका काढा आणि येत्या हिवाळी अधिवेशनात त्यावर दिवसभर चर्चा करा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शनिवारी केली.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार यांनी पुण्यातील ४० एकर महार वतनाची जमीन ३०० कोटी रुपयांना खरेदी केली. त्यासाठी केवळ ५०० रुपये मुद्रांक शुल्क रुपये भरले. हा भ्रष्ट कारभार उघड झाल्यानंतर आता जमीन खरेदी व्यवहार रद्द करण्यात आला. म्हणजे चोरी केल्याची कबुली देत आहेत. 'एफआयआर'मध्ये पार्थ पवार यांचे नाव का नाही, पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने या आधी पुण्याच्या बोपोडीतील ग्रिकल्चर डेअरीची सरकारी जमीन बोगस कागदपत्रांद्वारे हडप केली. हे पैसे कोणी दिले, कसे दिले, या प्रश्नांची उत्तरे नागरिकांना मिळाली पाहिजेत. चौकशी समिती नेमून सरकार फक्त वेळकाढूपणा करत आहे, असा आरोप सपकाळ यांनी केला.

भाजपचे केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुण्यात जैन बोर्डिंगची जमीन लाटली होती. तो प्रकार उघड होताच व्यवहार रद्द करण्यात आला, हे जाहीर करण्यात आले, पण हे प्रकरण संपलेले नाही. या प्रकरणातील धर्मादाय आयुक्त हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नातेवाईक आहेत. त्यांच्यावर काय कारवाई झाली? मुंबईत अदानीला शेकडो एकर जमीन फुकटात दिली. भाजपच्या मुंबईतील कार्यालयासाठी सरकारी जमिनीचा केलेला व्यवहार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उभा केलेला नवा शेठ मोहीत कंभोज यांना एसआरएच्या जमिनी दिल्या आहेत.

## प्रमुख प्रचारकांची संख्या आता २० ऐवजी ४०

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांकडून जाहीर करण्यात येणाऱ्या प्रमुख प्रचारकांच्या (डींरी उरारिळसपशी) संख्येची मर्यादा आता राज्य निवडणूक आयोगाने २० वरून ४० केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी असलेली प्रमुख प्रचारकांची मर्यादा वाढवून ४० करण्यात यावी, अशी मागणी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी आयोगाच्या कार्यालयात १४ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीत केली होती. 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' मधील परिच्छेद २६ मध्ये प्रमुख प्रचारकांसंदर्भातील तपशील नमूद केला आहे. त्यातील तरतुदींच्या आधारे आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी केलेली मागणी लक्षात घेऊन ही संख्या वाढविण्यात आली आहे. राजकीय पक्षांना प्रमुख प्रचारकांची यादी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी संबंधित जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे सादर करावी लागेल.

# नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राला देशात सर्वात पुढे ठेवा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचा गुन्हे सिद्धतेमध्ये चांगला उपयोग होत आहे. या कायद्यांच्या प्रत्येक घटकातील अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्राला देशात सर्वात पुढे ठेवावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत आयोजित बैठकीत दिले. ज्या घटकातील अंमलबजावणीमध्ये राज्य मागे आहे, अशा घटकाच्या अंमलबजावणीमध्ये पुढील काळात महाराष्ट्र देशात अन्य राज्यांच्या तुलनेत अव्वल असण्याची अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

बैठकीस गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.



**नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचा मुख्यमंत्र्यांनी घेतला आढावा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गुन्हा घडल्यानंतर जलद गतीने तपास पूर्ण करीत आरोपींना शिक्षा देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग या कायद्यांच्या अंमलबजावणीमधून करण्यात येत आहे. यामुळे निश्चितच जलद गतीने आरोपींना शिक्षा होत आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने नवीन फौजदारी कायद्यांची प्रभावीरित्या अंमलबजावणी करण्यात यावी. कायद्याच्या प्रत्येक घटकाची अंमलबजावणी करताना अन्य राज्यांशी तुलना करण्यात यावी. यावरून आपली स्थिती समजून ज्या घटकाच्या अंमलबजावणीत वेग घेणे आवश्यक आहे तो घेण्यात यावा. सीसीटीएनएस (क्राइम अँड क्रिमिनल ट्रेकिंग नेटवर्क अँड सिस्टीम्स) प्रणालीवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने नोंदविण्यात आलेले एफआयआर इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच न्यायालयाकडे जावेत. ही प्रणाली गतीने कार्यान्वित करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

आरोप सिद्ध झाल्यानंतर ६० दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल करण्याचे प्रमाण वाढविण्यात यावे. यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. या घटकाच्या प्रगतीचा विभागाने नियमित आढावा घ्यावा. कारागृह प्रशासनाच्या अनुषंगाने नागपूर आणि अमरावती दोन स्वतंत्र विभाग निर्माण करावे. नागपूर आणि वर्धा येथे नवीन कारागृह निर्मितीचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. यावेळी ठाणे कारागृह निर्मितीचा आढावाही घेण्यात आला.

ई- साक्ष ला एफआयआर संलग्न करण्याची कार्यवाही गतीने पूर्ण करावी. नागरिक केंद्रीत सेवा देण्यात याव्यात. गुन्हा दाखल झाल्यानंतर तक्रारदाराला संदेश जाऊन त्यांच्या तक्रारींची सद्यस्थिती कळविली पाहिजे. कायद्यांच्या अंमलबजावणी संदर्भात सर्व पोलीस यंत्रणाचे प्रशिक्षण पूर्ण करून वेळोवेळी क्षमता बांधणीचे उपक्रम राबविण्यात यावे. गुन्हा सिद्धतेमध्ये न्याय सहाय्यक प्रयोगशाळांच्या नवीन मोबाईल व्हॅनचा उपयोग करावा. सर्व २५१ व्हॅन उपलब्ध करून घ्याव्यात, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# पार्थ पवार अडचणी वाढल्या? मुख्यमंत्र्यांनी चौकशी करून वास्तव चित्र समोर ठेवावे : शरद पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अकोला: पुण्यातील कोरेगाव पार्क येथील जमीन गैरव्यवहारामुळे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार हे अडचणीत आले आहेत. काँग्रेसमधील विविध नेत्यांकडून या प्रकरणावरून पार्थ पवार यांच्यासह अजित पवारांनाही लक्ष्य केलं जात आहे. मात्र राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पार्थ पवारांची पाठराखण केल्याने पक्षात संभ्रम निर्माण झाला होता. आता अखेर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनीही आपली भूमिका मांडली असून थेट मुख्यमंत्र्यांकडे चौकशीची मागणी केली आहे.






शरद पवार यांनी म्हटलं की, पुण्यातील जमीन व्यवहाराचे प्रकरण गंभीर असल्याचं राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. एखादी गोष्ट गंभीर असल्याचं मुख्यमंत्री सांगत असतील तर त्याबाबत चौकशी करून वास्तव चित्र त्यांनी समाजासमोर ठेवलं पाहिजे. त्यामुळे ते काम त्यांनी करावं, अशी आमची अपेक्षा आहे, असं पवार म्हणाले. ते अकोला येथील पत्रकार परिषदेत बोलत होते.

दरम्यान, कुटुंबातील एका सदस्यावर जमीन गैरव्यवहाराचे आरोप झाल्याबद्दल पवार यांना प्रश्न विचारण्यात आला. मात्र प्रशासन, राजकारण, कुटुंब आणि कुटुंबप्रमुख या गोष्टींमध्ये फरक आहे. कुटुंबप्रमुख म्हणून म्हणाल तर आम्ही एकमेकांविरुद्ध निवडणुका लढवल्या आहेत. माझा एक नातू हा अजित पवारांविरोधात उभा होता. अजित पवारांची पत्नी माझ्या मुलीविरोधात निवडणुकीत उभी होती, असं पवार यांनी स्पष्ट केलं आहे.

सुप्रिया सुळे यांनी पार्थ पवारांची पाठराखण केल्याचं दिसून आलं होतं. हे प्रकरण ऐकल्यानंतर मी सकाळीच पार्थ पवार यांना फोन केला आणि नेमका विषय काय आहे, हे विचारलं. त्यावर, मी काहीही चुकीचं केलेलं नाही. माझ्या वकिलांशी बोलणं झालं आहे,' असं पार्थ म्हणाले. जर त्यांचे वकिलांशी बोलणे झाले असेल, तर वकील याबाबत स्पष्टीकरण देतीलच,' असे सुप्रिया सुळेंनी म्हटलं होतं.

दरम्यान, पुण्यातील जमिनीचे प्रकरण नेमकं काय आहे, हे सरकारने स्पष्ट केलं पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी याबाबत स्पष्टीकरण द्यायला हवं. जमीन सरकारी होती तर मग ती विकता येते का, जर विकता येत असेल तर नियमाप्रमाणे व्यवहार झाला का आणि तहसीलदार म्हणतात की कागदपत्रांवर मी सही केली नाही, मग सहीशिवाय व्यवहार झाला कसा? असे प्रश्न सुळे यांनी उपस्थित केले होते.

**जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक**



प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.

फक्त आमच्या कडेच

मतदार स्लिप नांव व मतदान केंद्रासहीत फक्त आमच्याकडेच मिळतील.

**प्रचार साहित्य**

१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

**नितीन कन्सलटन्सी**

नितीन हलसगी

मो. 9595427070 / 9270325070

# स्वातंत्र्याची जाणीव, संघर्ष आणि जबाबदारी : जागतिक स्वातंत्र्य दिनाचे समाजशास्त्रीय चिंतन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मानवजातीच्या इतिहासातील सर्वात मूलभूत आणि आधारभूत मूल्य जर कोणते असेल, तर ते म्हणजे स्वातंत्र्य होय. मनुष्य जन्मतः स्वतंत्र असतो, त्याला विचार करण्याचा, जगण्याचा, निर्णय घेण्याचा अधिकार जन्मापासूनच प्राप्त असतो. परंतु इतिहासाच्या विविध टप्प्यांत हे स्वातंत्र्य अनेकदा हिरावले गेले, त्याला बंधनांत अडकविण्यात आले, त्याच्या मनावर, शरीरावर आणि जीवनावर बाह्य शक्तींचे वर्चस्व प्रस्थापित करण्यात आले. कधी वसाहतवादाच्या रूपाने, कधी गुलाम गिरीच्या रूपाने, कधी हुकूमशाहीच्या राजकीय व्यवस्थेद्वारे, तर कधी समाजा- तील विषमता, जात, धर्म, लिंग आणि वर्ग यांच्या नावावर व्यक्तीवर नियंत्रण ठेवण्यात आले. म्हणूनच ९ नोव्हेंबर रोजी साजरा होणारा 'जागतिक स्वातंत्र्य दिन' हा दिवस केवळ एका ऐतिहासिक आठवणीचा दिवस नसून स्वातंत्र्याच्या संघर्षाला, त्याच्या मूल्यांना आणि त्याच्या रक्षणाच्या सततच्या बांधिलकीला पुनर्स्मरण करण्याचा दिवस आहे.

स्वातंत्र्य ही केवळ राजकीय संकल्पना नाही, ती सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक, मानसशास्त्रीय आणि आर्थिक स्तरांवर पसरलेली एक बहुआयामी मूल्यव्यवस्था आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीला स्वतःच्या अस्तित्वाचे आणि ओळखीचे भान देणारी प्रक्रिया होय. मनुष्य समाजात जगतो, त्यामुळे त्याचे स्वातंत्र्य हे वैयक्तिक असले तरी त्याचे परिणाम सामूहिक असतात. स्वातंत्र्य म्हणजे बंधनांचा अभाव एवढाच मर्यादित अर्थ नसून, स्वातंत्र्य म्हणजे न्याय्य, सुरक्षित, समान आणि मानवी प्रतिष्ठेने जगण्याचा हक्क होय. स्वातंत्र्य म्हणजे समाजातील सर्व व्यक्तींना संधींची समानता आणि योग्य साधनसंपत्ती उपलब्ध करून देणारी सामाजिक व्यवस्था होय. व्यक्तीच्या स्वातंत्र्याबरोबरच समाजाच्या विकासाच्या प्रक्रिया एकमेकांशी अभेद्यरीत्या जोडलेल्या आहेत.

मानवजातीने स्वातंत्र्यासाठी असंख्य संघर्ष केले आहेत. इतिहासातील प्राचीन साम्राज्यांनी लोकांना गुलाम केले, गोऱ्या वंशाने काळ्या वंशाच्या लोकांवर आपले वर्चस्व गाजविले, साम्राज्यशाही शक्तींनी आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका या प्रदेशांना वसाहतवादाच्या जाळ्यात अडकविले, धर्माच्या किंवा शासनाच्या नावावर विचार आणि अभिव्यक्तीवर बंदी घालण्यात आली. या सर्व परिस्थितींना मनुष्याने आव्हान देत स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी चळवळी उभ्या केल्या. भार- ताची स्वातंत्र्य चळवळ ही जगातील सर्वात महत्त्वाच्या आणि अनुकरणीय संघर्षांपैकी एक ठरली. महात्मा गांधी, नेहरू, भगतसिंग, सुभाषचंद्र बोस, सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जवाहरलाल नेहरू, राजर्षी शाहू महाराज यांसारख्या असंख्य नेत्यांनी स्वातंत्र्याची व्याख्या फक्त परकीय शासनाच्या समाप्तीपर्यंत मर्यादित ठेवली नाही; त्यांनी स्वातंत्र्याला सामाजिक समानता, शैक्षणिक हक्क, आर्थिक न्याय, लिंग-समानता, जात-व्यवस्था निर्मूलन आणि मानवी प्रतिष्ठा यांसोबत जोडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली 'स्वातंत्र्य - समता - बंधुता' ही त्रिसूत्री मानवी स्वातंत्र्याच्या संकल्पनेचे सर्वोच्च तात्त्विक परिमाण आहे. त्याच्या आधारे भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला विचारस्वातंत्र्य, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, श्रद्धास्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेने जगण्याचा हक्क दिला आहे. परंतु समाजातील जातीय असमानता, पितृसत्ता, धार्मिक कट्टरता, संपत्तीचे असमान वाटप, ग्रामीण-शहरी दरी, गरीबी, निरक्षरता, बेरोजगारी, डिजिटल विभाजन, माध्यमांच्या एकाधिकारशाही आणि राजकीय ध्रुवीकरण यांसारख्या घटकांमुळे स्वातंत्र्य आजही अनेकांच्या आयुष्यात अपूर्ण, असमान आणि अधुरेच आहे.

आज 'स्वातंत्र्य' याची पुनर्व्याख्या करण्याची गरज आहे. आज व्यक्तीला राजकीयदृष्ट्या मतदानाचा हक्क आहे, अभिव्यक्तीची स्वायत्तता संविधानाने दिली आहे, परंतु डिजिटल युगात अभिव्यक्तीवर असलेल्या छुप्या नियंत्रणाचा, इंटरनेटवरील माहितीच्या गोंधळाचा, खोट्या प्रचाराचा, ट्रोल संस्कृतीचा, आणि विचारांवर होत असलेल्या मानसिक वर्चस्वाचा प्रश्न अधिक गंभीर स्वरूपात समोर आहे. हे बंधन अदृश्य आहे, भिंत दिसत नाही, परंतु मन आणि विचार कैद होतात.

आजही स्वतंत्र आणि लोकशाही राष्ट्रांमध्ये दिसणाऱ्या अनेक असमानता दर्शवितात की स्वातंत्र्य हा अंतिम ध्येय प्राप्तीचा टप्पा नसून तो सतत जपण्याचा आणि विस्तारित करण्याचा संघर्ष आहे. संविधानाने दिलेले अधिकार असले तरी समाजाची मानसिकता जर संकुचित, भेदभावपूर्ण आणि वर्चस्ववादी असेल तर हे स्वातंत्र्य केवळ कागदावरच राहते. उदा. व्यक्तीला विचारस्वातंत्र्य आहे, पण त्याच्या विचारावर हिंसेची प्रतिक्रिया झाली तर ते स्वातंत्र्य धोक्यात येते. महिलांना शिक्षण आणि कामाचा अधिकार आहे, परंतु पितृसत्ताक नियंत्रणामुळे त्यांच्या निर्णयस्वातंत्र्यावर बंधने येतात. दलित, आदिवासी, अल्पसंख्याक समुदायांना कायदेशीर समानता आहे, पण सामाजिक स्तरावर अजूनही त्यांना भेदभाव, बहिष्कार आणि शोषणाचा सामना करावा लागतो. म्हणूनच स्वातंत्र्याचे खरे मूल्य व्यक्तीच्या दैनंदिन जीवनात आणि समाजाच्या वर्तनात कसे प्रतिबिंबित होते, यावर अवलंबून आहे.

आजच्या जागतिक जगतात स्वातंत्र्याच्या संकल्पनेसमोर नव्या आव्हानांची मालिका उभी राहिली आहे. तंत्रज्ञानाने संवाद, शिक्षण, अर्थव्यवस्था आणि विचारांची देवाणघेवाण यांना गती दिली आहे, परंतु त्याचवेळी तेच तंत्रज्ञान निगराणी, डेटा-नियंत्रण, माहितीचे अपहरण, भ्रम-जागरूकता, आणि मानसिक गुलामगिरी निर्माण करण्याचे साधन बनत आहे. सोशल मीडिया ही माहिती स्वातंत्र्याची जागा असूनही तेथे द्वेष, फूटपाडणी, कट्टरमतवाद, मिथ्यप्रचार आणि वैयक्तिक विचारांचे नियंत्रण या गोष्टी वाढताना दिसतात. गोपनीयतेचा हक्क आणि सुरक्षिततेची गरज यांच्यातील संघर्ष दिवसेंदिवस गुंतागुंतीचा होत आहे. लोकशाही देशांमधील सत्ताकेंद्रे हळूहळू पुन्हा केंद्रीकृत होत असल्याचे दिसून येते, आणि नागरिकांना अज्ञानातून किंवा प्रचारातून नियंत्रित करण्याच्या पद्धती अधिक सूक्ष्म आणि धोकादायक बनत आहेत.

जागतिक स्तरावर आर्थिक असमानता ही स्वातंत्र्याला सर्वात मोठे घाव घालणारी प्रक्रिया आहे. जगातील केवळ काही टक्के लोकांकडे बहुसंख्य संपत्ती केंद्रित झाली आहे, तर मोठा लोकसमूह गरिबी, बेरोजगारी, भूक, कुपोषण आणि संघर्षांच्या सावटाखाली जगत आहे. आर्थिक हक्कांशिवाय स्वातंत्र्य अपूर्ण राहते. समाजशास्त्रीय भाषेत सांगायचे झाल्यास स्वातंत्र्याची खरी व्याप्ती म्हणजे सामाजिक-आर्थिक संधींची समानता होय. जर एखाद्या व्यक्तीला त्याच्या कर्तृत्वानुसार प्रगती करता येत नसेल, त्याला शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सांस्कृतिक सहभागाच्या संधी मिळत नसतील, तर त्याचे स्वातंत्र्य तुटपुंजे आणि भावनिक स्वरूपाचे ठरते.

भारतातील स्वातंत्र्याची सामाजिक प्रकृती समजून घेण्यास सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकशाही होय. लोकशाही ही फक्त निवडणुकांमधील मतदानाची प्रक्रिया नसून, ती नागरिकांचा सहभाग, संवाद, उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि विचार-विनिमय यांची सातत्यपूर्ण सामाजिक साधना आहे. जेव्हा नागरिक जागरूक असतात, तेव्हा स्वातंत्र्य सुरक्षित राहते. पण जेव्हा नागरिक अज्ञान, उदासीनता किंवा भीतीच्या छायेत अडकतात, तेव्हा स्वातंत्र्य कमजोर होऊ लागते. म्हणूनच स्वातंत्र्य टिकवण्यासाठी शिक्षण, विवेक, मानवतावाद आणि सामाजिक जागरूकता या मूल्यांचे संवर्धन अनिवार्य आहे.

स्वातंत्र्याचा सर्वात मूलभूत भाग म्हणजे मानवी प्रतिष्ठा होय. कोणत्याही व्यक्तीला त्याच्या वंशामुळे, धर्मामुळे, लिंगामुळे, भाषेमुळे किंवा सामाजिक-आर्थिक स्थितीमुळे कमी लेखले जाऊ नये. समाजात परस्पर आदर, सहिष्णुता, विविधतेची स्वीकृती आणि मानवी मूल्यांवरील विश्वास हे स्वातंत्र्याचे संरक्षण करणारे स्तंभ आहेत. स्वातंत्र्याला प्रेम, करुणा, संवेदनशीलता आणि न्यायाची जोड मिळाली तरच ते मानवी विकासाचे साधन बनते.



आजच्या या जागतिक स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आपल्यासमोर सर्वात महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो तो म्हणजे आपण स्वतंत्र आहोत, पण स्वातंत्र्यवादी आहोत का? म्हणजेच, आपण केवळ स्वातंत्र्य उपभोगतो की त्याची जबाबदारीही पार पाडतो? स्वातंत्र्य हे अधिकारांसोबत कर्तव्यांचीही मागणी करते. समाजातील अन्याय, भेदभाव, विषमता, हिंसा आणि दडपशाहीविरुद्ध आवाज उठविणे हीच स्वातंत्र्याची खरी परीक्षा आहे.

शेवटी असे म्हणता येईल की स्वातंत्र्य हे मिळवण्याची गोष्ट नसून जपण्याची प्रक्रिया आहे. ते सतत विचारले, तपासले, पुनर्निर्मित केले आणि सामूहिकपणे संरक्षित केले पाहिजे. स्वातंत्र्य म्हणजे फक्त आपले हक्क नव्हे; तर इतरांच्या हक्कांचा आदर करण्याची जाणिव होय. जागतिक स्वातंत्र्य दिन हा दिवस आपल्याला मानवी मूल्यांची आठवण करून देतो आणि आपल्याला सामाजिक न्याय, सहकार्य, समानता आणि मानवतावादी दृष्टिकोनाची दिशा दाखवतो. स्वतंत्र राष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाने हे स्मरण ठेवले पाहिजे की स्वातंत्र्याचे रक्षण हीच खरी नागरिकधर्माची साधना आहे, आणि ही साधना जिवंत ठेवणे हीच मानवतेची उज्ज्वल बांधिलकी आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे (समाजशास्त्राचे अभ्यासक) मो. ९९६०१०३५८२, ईमेल – bagate.rajendra5@gmail.com**

# 'गावगाथा' दिवाळी अंक : माणुसकी, संस्कृती अन् मातीचा सुगंध .....

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अनुभवलेला गाव, त्या गावाच्या मातीशी, गंधवाऱ्याशी जुळलेल्या, मनाला ओलावा देणार्या, जगण्याचे समाधान देणार्या आठवणी आयुष्याची पुंजी म्हणून सतत आपल्या सोबत असतात.

'आठवणीला गाव 'याच विषय संकल्पनेवर आधारित आहे यावर्षीचा 'गावगाथा' हा दिवाळी अंक.

संपादक आहेत आदरणीय श्री धोंडपा नंदे,

संपादकीय दोन शब्दात सुंदर विचार मांडताना ते म्हणतात 'गाव म्हणजे केवळ जागा नाही, ती आपल्या संस्कृतीचे, मूल्यांचे आणि ओळखीचे प्रतिबिंब आहे.

गावगाथा दिवाळी अंकाचे मुखपृष्ठ केवळ अप्रतिम! खूप काही सांगून जाणारे आहे. तसेच अंकाची बांधणी व आतील मांडणी खूप सुरेख झाली आहे.

अंकात जेष्ठ साहित्यिक इंद्रजित भालेराव, श्रीधर लोणी, प्रा. रामदास केदार यांचे लेख आहेत. यासोबतच अनेक नामवंत लेखकांचे लेख सुद्धा आपल्याला वाचायला मिळतात.

पोलिस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी त्यांच्या बालपणा- तील सुंदर आठवणींना उजाळा दिला आहे. श्रीधर लोणी सर आठवणींच्या पुस्तकांच्या गावात सहजच घेऊन गेले. वरीवाडा हा इंद्रजित भालेराव यांचा अतिशय सुंदर लेख आहे त्यांच्यासोबत आपणही ती गढी अनुभवतो.

रजनीश जोशी गावातील नदी नदीच्या पात्रातील जपलेल्या आठवणी जिवंतपणे मांडल्या आहेत. प्रा. रामदास केदारांनी देऊळवाडी गावा- तील देवळांचे, मंदिर संस्कृतीचे दर्शन घडवले.

याशिवाय वाचतांना गा- वातील सण उत्सवाची परंपरा, गावा- तील शेजारधर्म, आजोळच्या गावाच्या आठवणी, मामाचा वाडा, गावची जत्रा, गावातील पोळा, गावातील खेळ, रानमेवा,हुरडा, आठवडी बाजार, हे सर्व डोळ्यासमोर येत राहतं.

किर्ती लंगडे यांनी दिवाळी निमित्त गावात साजरे होणारे नाटकं, तमाशा असे लोककला जपणारे लोकसांस्कृतीक कार्यक्रमांची वेगळी माहिती सांगितली.

कुठे स्वप्नवत कल्पनेतल्या गा- वात रममाण होता येत तर कुठे गाव हरवलेल्या गावाची हुरहुर वाटते. मांजरी खुर्द, सासवड या गावांची जुनी ओळख , चिंचणी या विकसित स्वयंपूर्ण खेड्याची नवीन ओळख आपल्याला होते.

गाव आठवला की डोळ्यासमोर सर्वात आधी येतात ते शाळा मास्तर समीर गायकवाड यांनी नारायण कुलकर्णी या आदर्श गुरुजींची सुरम्य आठवण सांगितली आहे.

जेष्ठ साहित्यिक माधव राजगुरू यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास, काही मार्मिक, वास्तविक लेख, माणुसकीच्या बुलंद स्वराचा एकमेकाशी साद घाला- वा असा कळकळीचा लेख आपल्याला वाचायला मिळतो. अंतःकरणातून सेवे- चे व्रत घेणारे पत्रकार मंगेश चिवटे या आदर्श व्यक्तिमत्वाची ओळख धोंडपा नंदे सरांनी करून दिली.

गावाचा स्पर्श असलेल्या कथा, कवितांनी सजलेला हा अंक ज्ञान आणि आनंद देणारा आहे.


एकूणच गाव संस्कृतीला न्याय देणारा परिपूर्ण अंक नक्किच वाचनीय आहे.

अंकात समाविष्ट सर्व लेखकांचे साहित्य सुंदर आहे.

श्री धोंडपा नंदे सरांचे मनःपूर्वक आभार, अभिनंदन व

खूप खूप शुभेच्छा.

**– सौ. वैशाली गावंडे**
**निगडी पुणे**




# सोशल मीडियाच्या मदतीने हरवलेले लातूरचे भक्त जगदीश पवळे तब्बल सहा तासांनी सापडले!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : सोशल मीडियाचा योग्य वापर केल्यास तो जीवन वाचवू शकतो, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

अक्कलकोट श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी लातूर येथील ४० भाविक अक्कलकोट येथे आले होते.

सर्व ४० भाविकांनी श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेऊन पंढरपूरला दर्शनासाठी निघणार होते तितक्यात त्या ४० भाविकांपैकी जगदीश पवळे हे तंबाखु तोठा आणण्यासाठी पान टपरीकडे गेले.

जगदीश पवळे यांच्यासोबत आलेले भाविक व बसचे ड्रायव्हर हे सर्वजण जगदीश पवळे यांची परत येण्याची वाट बघत राहिले, त्यानंतर खूप वेळ झाला हे परत का आले नाहीत हे बघण्यासाठी त्यांच्यासोबत असलेले राम नामदेव मोहिते, मारुती शेळके व अन्य दोन जन जगदीश पवळे यांना बघण्यासाठी माणिकपेट वागदरी रोडच्या दिशेने निघाले परंतु जगदीश पवळे हे कुठेच दिसून आले नाही.

त्यानंतर राम नामदेव मोहिते, मारुती शेळके व अन्य दोन जन असे एकूण चारही जण रिक्षा करून शहरात हुडकण्यास सुरुवात केली.



घडलेली सर्व घटना त्या रिक्षा चालक सय्यद तांबोळी यांना सांगितले हे सांगताच रिक्षाचालक सय्यद तांबोळी त्या भाविकांना सांगितले की आमच्या शहरात आमचे मित्र सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास हे अशा लोकांच्या शोध घेण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करतात असे सांगितले.

त्यानंतर सय्यद तांबोळी यांनी सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास यांना कॉल करून कारंजा चौक येथे बोलावून घेतले.

सामाजिक कार्यकर्ता सोहेल फरास व सैपन शेख आम्ही दो- घेही कारंजा चौक येथे गेलो आणि त्या भाविकांशी भेटलो आणि सदर सर्व घटना त्या भाविकांनी सांगितले व त्या व्यक्तीचा नाव व फोटो व्हाट्सअप वर पाठविले व त्यासोबतच राम नामदेव मोहिते, मारुती शेळके नंबरही दिले.

सदर जगदीश पवळे रात्री ८:०० वाजण्याच्या सुमारास माणिक पेठ वागदरी रोड येथून त्या भाविकांतून हरवले मिसिंग झाले आहेत त्यांचा आम्ही शोध घेत आहोत ते अद्याप आम्हाला मिळाले नाहीत आपल्याकडून ह्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी मदत हवी आहे असे सांगितले.

त्यानंतर मी लगेच सोशल मीडिया फेसबुक व व्हाट्सअप ग्रुप वर लातूरचे भाविक जगदीश पवळे हे मिसिंग आहेत हरविले आहेत अशी सोशल मीडिया वरती पोस्ट टाकली.

व त्या चारही भाविकांना घेऊन अक्कलकोट शहरा- तील कारंजा चौक,समाधी मठ,एसटी स्टँड, ए वन चौक,स्वामी समर्थ मंदिर परिसर आणि अन्नछत्र मंडळ परिसर,पार्किंग परिसर मेन रोड विजय कामगार चौक इत्यादी ठिकाणी त्यांचा शोध घेतला परंतु कोठेच त्यांचा पत्ता लागला नाही.

११:४२ मिनिटाला सैपन नीटोरे यांचा कॉल आला फेसबुक वर टाकलेल्या मिसिंग पोस्ट मधील व्यक्ती दहाच्या सुमारास भेटली होती आणि एसटी स्टँड कुणीकडे आहे अशी विचारणा केली आणि ते स्टॅन्ड च्या दिशेने गेल्याचे सांगितले.

त्यानंतर पुन्हा आम्ही सर्वजण स्टॅन्ड कडे गेलो आणि संपूर्ण स्टॅन्ड परिसर शोधलो परंतु ते त्या ठिकाणी सापडले नाही.

आम्ही पुन्हा सर्वजण ज्या ठिकाणी ट्रॅव्हल्स बस पार्किंग केली आहे त्या ठिकाणी परत आलेत का हे बघण्यासाठी मंदिरच्या पार्किंग कडे गेलो व त्या ठिकाणी असलेल्या भाविकांना विचारणा केली की सदर व्यक्ती परत आले आहेत का परंतु लातूरच्या भाविकांनी सांगितले ते इकडे परत आलेच नाही.

पुन्हा खासबाग येथील एका मित्राचा कॉल आला की सदर व्यक्ती सोलापूर रोड चादर शोरूमच्या पुढे माझ्या हॉटेल येथे ही व्यक्ती आली होती आणि ती व्यक्ती सोलापूरच्या दिशेने पंढरपूर कडे पायी चालत गेली आहे असे सांगितले.

त्यानंतर मी लगेच माझे सहकारी मित्र रशीद किस्तके यांना ११ वाजून ५१ मिनिटाला कॉल करून सदर सर्व घटना सांगितली आणि मिसिंग झालेली ती व्यक्ती सोलापूरच्या दिशेने जात आहे असे कॉल आले आहे आपण व लातूरचे भाविक मिळून जगदीश पवळे यांना शोधण्यासाठी जाऊ असे सांगितले.

सहकारी मित्र रशीद किस्तके कोणताही विलंब न करता लगेच आमच्या गल्लीतील मशाग अन्सारी व एजाज चाबुकस्वार या दोघांना घेऊन पार्किंग या ठिकाणी आले त्यानंतर लगेच आम्ही सर्वजण टू व्हीलर वर सर्वजण सोलापूर रोडच्या दिशेने निघालो आणि खासबाग येथील मित्र ही एम एसईबी चौक येथे मिळाले आम्ही सर्वजण मिळून जगदीश आवळे यांना शोधण्यासाठी निघालो.

पाई चालून चालुन थकून सोलापूर रोड समर्थ शिवनेरी फॅमिली रेस्टॉरंट च्या समोरच्या बाजूस दोन्ही रोडच्या मध्यभागी असलेल्या डिव्हायडर वर जगदीश पवळे हे अंधारात बसलेले होते.

मंदिर परिसरातून हरवलेले मिसिंग झालेले लातूरचे जगदीश पवळे या भक्ताचा शोध तब्बल सहा तासाच्या प्रयत्नांनंतर रात्री १२:५६ मिनिटांनी यशस्वीरीत्या सुखरूप लागला .

फेसबुक आणि व्हॉट्सॲपवरील शेअर केलेल्या पोस्टमुळे जगदीश पवळे सुखरूप परत मिळाले.

ट्रॅव्हल्स बस ड्रायव्हरला फोन लावून सोलापूर रोड समर्थ शिवनेरी फॅमिली रेस्टॉरंट येथे बोलवून घेतले व जगदीश पवळे यांना त्या लातूरच्या भाविकांच्या सुपूर्त करण्यात आले.

जगदीश पवळे यांना शोधण्यासाठी केलेल्या मदतीबद्दल त्यांनी पैसे देण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांना मी एकच गोष्ट सांगितली हा काम मी कधीच पैशासाठी केला नाही आणि यापुढेही करणार नाही तरीसुद्धा त्यांनी वारंवार किमान अडीच ते तीन तास तुमच्या गाडीवर फिरलो त्या गाडीमधील पेट्रोलचे तरी पैसे घ्या असे सांगितले परंतु माझा त्यांना पैशासाठी स्पष्ट नकार होता.

लातूरच्या जगदीश पवळे भाविकाला शोधण्यासाठी रात्री एक वाजेपर्यंत केलेली मदत उपकाराबद्दल बस ट्रॅव्हलचे ड्रायव्हर व भाविकांनी आभार मानले माझी व संपूर्ण टीमच्या सामाजिक कार्याची कौतुक केले व असेच सामाजिक काम तुमच्या हातून घडो असे शुभेच्छा दिले.

या शोध मोहिमेत सोहेल फरास,सैपन शेख, सय्यद तांबोळी(रिक्षा ड्रायव्हर),रशीद खिस्तके, मशाक अन्सारी, एजाज चाबूकसवार आदींचा सहकार्य लाभला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री स्वामी समर्थ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे वंदे मातरम सार्थ शताब्दी महोत्सव संपन्न

## मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करून उद्घाटन; संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांकडून लघु नाटिका सादर







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे वंदे मातरम सार्थ शताब्दी महोत्सव फत्तेसिंह मैदान येथे संपन्न झाला प्रथम आलेले सर्व मान्यवरांचे स्वागत संस्थेतील शिल्प निदेशक श्री दिनेश मंठाळे सर यांनी केले सदर महोत्सवच्या कार्यक्रम अध्यक्षस्थानी नायब तहसीलदार श्री दत्तात्रय गायकवाड यांची निवड करण्यात आली त्यास अनुमोदन संस्थेचे जेष्ठ शिल्प निदेशक नदाफ सर यांनी दिले. सदर महोत्सवाचे उद्घाटन भारत माता प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन आयएमसी अध्यक्ष श्री राजशेखर हिपरगी, आयएमसी सदस्य कमलाकर सोनकांबळे,यासह मान्यवराच्या हस्ते करण्यात आले सदर महोत्सवाची प्रस्तावना संस्थेचे शिल्पनदेशिका सौ रेणुका गवल मॅडम यांनी केली त्यामध्ये वंदे मातरम हे गीत बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी १८७५ साली लिहिलेले गीत स्वातंत्र्यलढ्यात तसेच स्वतंत्र्य कालखंडात ही अन्य न साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे आनंदमठ या कादंबरीतील हे गीत भारत मातेच्या स्तुतीचे प्रतीक असून स्वातंत्र लढ्यातील असंख्य क्रांतिकारक व प्रेरणादायी ठरलेले आहे या गीतास दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी १५० वर्ष पूर्ण होत आहे या ऐतिहासिक महत्त्वाच्या घटनेच्या निमित्ताने राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये कौशल्य विद्यापीठ कौशल्य विकास केंद्र इत्यादी मध्ये भारत मातेच्या स्तुतीचा गौरव दिन साजरा करण्यात आला वंदे मातरम गीताचे सामूहिक गायन करण्यात आले त्यानंतर संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांकडून लघु नाटिका सादर करण्यात आली त्यानंतर अध्यक्षीय भाषणामध्ये नायब तहसीलदार गायकवाड यांनी वंदे मातरम सार्थक शताब्दी महोत्सव बद्दल महत्त्वपूर्ण अशी माहिती दिली. त्यानंतर सदर महोत्सवाचे मुख्य वक्ते श्री अभिजीत लोके सर यांनी बंकिम चंद्र चटोपाध्याय यांनी लिहिलेले वंदे मातरम हे गीत अत्यंत प्रेरणादायी असून त्याचे अवलोकन प्रत्येक नागरिकांनी केले पाहिजे याची प्रचिती सर्व प्रशिक्षणार्थी व उपस्थितांना करून दिली त्यानंतर वंदे मातरम गीताचे समूह गायन करण्यात आले सदर महोत्सव करिता संस्थेचे प्राचार्य श्री मोरे साहेब यांचे अनमोल असे मार्गदर्शन लाभले तसेच संस्थेचे गटनिदेशक श्री गणेश काशीद सर यांचे संयोजनाखाली व मार्गदर्शनाखाली सदर महोत्सव घेण्यात आला व. सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे शिल्प निदेशक श्री वाघमारे सर यांनी केले सदर कार्यक्रमाकरिता प्रमुख पाहुणे मान्यवर म्हणून आयएमसी अध्यक्ष श्री राजशेखर हिपरगीसाहेब,आयएमसी सदस्य कमलाकर सोनकांबळे, चनशेटी सर सौ काळे मॅडम सौ साळुंखे मॅडम खेडगी कॉलेजचे श्री हिंदोळे सर अर्जुन सर होटकर सर व संस्थेतील शिल्प निदेशक श्री बगले सर लिंबे सर बोंगाळे सर स्वामी सर कोणापुरे सर बिराजदार सर श्री खंदारे सर श्री सोनंद सर व लोटे मेजर क्षीरसागर मेजर पाटील मेजर अस्वले मेजर यांनी परिश्रम घेतले आदींनी परिश्रम घेतले घेतले

# उपनगर जिल्हास्तरीय कॅडेट स्पर्धा उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : मुंबई उपनगर जिल्ह्याच्या १२ ते १४ वयोगटातील कॅडेट खेळाडूंसाठी घेतलेली जिल्हास्तरीय स्पर्धा मीनाताई ठाकरे मैदान, चेंबूर वाशी नाका येथे उत्साहात पार पडली. स्पर्धेला मुलांकडून मोठा प्रतिसाद मिळत, विविध गटांत जलद, दमदार आणि कौशल्यपूर्ण खेळांचे प्रदर्शन पाहायला मिळाले.या स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावणारे खेळाडू मुंबई उपनगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व राज्यस्तरावरील स्पर्धेत करणार आहेत. त्यामुळे खेळाडूंमध्ये उत्साह आणि आनंदाचे वातावरण असल्याचे सांगण्यात आले.कार्यक्रमास जिल्ह्याचे सचिव जयदीप कदम, खजिनदार संतोष वस्त, मुंबई जिल्हाचे सचिव विजय कांबळे, अनिल रोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच

**सुवर्णपदक विजेते खेळाडू राज्यस्तरावर करणार प्रतिनिधित्व**




स्पर्धा निरीक्षक म्हणून रेल्वे पोलीस दलाचे प्रशिक्षक अजय लोखंडे यांनी मार्गदर्शन केले. जिल्हास्तरीय पातळीवरून राज्यस्तराकडे खेळाडूंची वाटचाल निश्चित करणारी ही स्पर्धा यशस्वीपणे पार पडल्याने पालक, प्रशिक्षक आणि आयोजकांनी समाधान व्यक्त केले.

# अनिल खरटमल यांचा सेवानिवृत्तीबद्दल सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर महापालिका विभागीय कार्यालय क्रमांक दोनकडील लिपिक श्री.अनिल सदाशिव खरटमल हे चौथीस वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झाले. त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. अनेक मान्यवरांनी त्यांना शुभेछ्या दिल्या. महापालिकेत रोजंदारीवर कामाला लागलेल्या श्री.खरटमल यांनी नोकरी करीत पदवीचे शिक्षण घेतले.त्यांनी अनेक खात्यात सेवा बजावली. त्यांनी स्वतःबरोबर तीन मुली व मुलास उच्च विद्याविभूषित केले.

सेवानिवृत्तीनिमित आयोजित कार्यक्रमात श्री.खरटमल यांना माजी महापौर यू.एन.बेरिया, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष श्री.दशरथ वडतिले, विभागीय कार्यालयाचे अधीक्षक श्री.पंडित वडतिले तसेच सर्वश्री जगन्नाथ बनसोडे,




डॉ. सुवर्णा बासुतकर, डॉ.सारिका देगावकर, डॉ.सुजाता कुलकर्णी, ॲड.गंगाधर कोकणे, शुभम लांबतुरे, दिनेश गायधनकर, दशरथ शिंदे, अर्जुन कोकने, खाजपा कट्टिमनी, अरुण साळुंके, नागराज सोनवणे व लावणी कलाकार भाग्यश्री मुंबईकर आदींनी शाल, श्रीफळ,भेटवस्तू व कपडे देऊन सत्कार केला व शुभेछ्या दिल्या.

# पंढरपूर नगरपालिका निवडणुकीसाठी भाजपा मध्यवर्ती कार्यालय टिळक स्मारक येथे इच्छुकांच्या अर्ज स्वीकृती




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपालिकेच्या होऊ घातलेल्या निवडणुकीसाठी पंढरपूर नगरपालिका निवडणुकीत इच्छुकांच्या अर्ज स्वीकृतीसाठी भारतीय जनता पार्टीचे मध्यवर्ती कार्यालय टिळक स्मारक मंदिर येथे स्थापन केले आहे.

पंढरपूर नगरपालिकेच्या भाजपच्या इच्छुक उमेदवारांनी आपापले अर्ज पंढरपूर नगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने मध्यवर्ती कार्यालय टिळक मंदिर येथे केले असून इच्छुकांनी या कार्यालयात अर्ज जमा करावी अशी अशी माहिती पंढरपूर भाजपचे शहर अध्यक्ष लाला पानकर यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे यावेळी उपस्थितीत भाजपचे तालुकाध्यक्ष सुभाष मस्के सर, अक्षय वाडेकर यांच्यासह भाजपचे शहरातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किणी भीम नगर येथे विद्यार्थी दिनानिमित्ताने शालेय साहित्य वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : किणी भीम नगर मध्ये विद्यार्थी दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. विद्यार्थी दिनाच्या औचित्य साधून सागर सोनकांबळे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. विद्यार्थी दिनाचे महत्त्व व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा त्याग या विषयावर संजय किनीकर, भीम सोनकांबळे, सागर सोनकांबळे, रत्नाशील जैनजांगडे यांनी मार्गदर्शन केलं .तथागत महाकारूणी गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या प्रतिमेच्या पूजनाने त्याचप्रमाणे संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.यावेळी प्रमुख उपस्थित डॉ. शिवा रामशेट्टी, जे.एन सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.बाबासाहेब सोनकांबळे, माजी सरपंच महादेव बनसोडे, कालिदास कांबळे, सदनशील शेतकरी गंगाधर माने, लक्ष्मण जाधव, दिनेश सोनकांबळे,ग्राम पंचायत सदस्य नूर मत्तेखाने, महादेव सोनकांबळे, शंकर जैनजांगडे, पंचशील सोनकांबळे, विश्वनाथ सोनकांबळे,परमेश्वर सोनकांबळे,अल्लाउद्दीन बावशे, श्रीमंत सोनकांबळे, निलेश कांबळे, नितीन व्हणमाने, प्रसाद भोसले, राम सोनकांबळे,यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमासाठी उपस्थित नितीन जैनजांगडे, स्वप्निल बोरे, पद्मश्रील जैनजांगडे, गणेश वाघमारे, सिद्धार्थ जैनजागडे, नागेश जैनजांगडे,दादा जैनजांगडे, नागेश कांबळे, भीमाशंकर सोनकांबळे, आनंदराव सोनकांबळे, दामोदर बनसोडे, पवन सोनकांबळे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इंजिनीयर विश्वनाथ शिंदे, दगडू सोनकांबळे, परमेश्वर सोनकांबळे, अशोक सोनकांबळे, वसंत सोनकांबळे, बाळासाहेब कांबळे, शेखर जैन जांगडे, सुखदेव सोनकांबळे, जनार्दन सोनकांबळे, राजकुमार सोनकांबळे, सम्यक सोनकांबळे, विठ्ठल इरसुर, महेश सोनकांबळे , नमित माने यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. चंदन सोनकांबळे यांनी मांडले.

**प्रक्षाळपुजेनिमित्त श्रींच्या दर्शन वेळेत बदल**

# कार्तिकी यात्रा: श्री विठ्ठल रूक्मिणीमातेची रविवारी प्रक्षाळपुजा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : दरवर्षी कार्तिकी यात्रेला भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, यात्रा कालावधीत चांगला महुर्त व दिवस पाहून श्रींचा पलंग काढून भाविकांना जास्तीतजास्त वेळ दर्शन उपलब्ध करून देण्यात येते. दिनांक २६ ऑक्टोंबर रोजी श्रींचा पलंग काढल्याने काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती इ. राजोपचार बंद होऊन नित्यपुजा, महानैवेद्य व गंधादक्षा हे राजोपचार सुरू होते. सदरचे राजोपचार पूर्ववत करण्यासाठी चांगला महुर्त व दिवस पाहून दिनांक ०९ नोव्हेंबर रोजी श्रींची विधिवत प्रक्षाळपुजा करण्यात येणार



असल्याची माहिती प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.

प्रक्षाळपुजेनिमित्त दिनांक ०९ नोव्हेंबर रोजी श्रींच्या दर्शन वेळेत बदल होणार असून, पहाटे ५.०० ते दु.१२.२०, दु.१२.३० ते २.१०, दु.५.३० ते ६.४५, रा.७.१० ते ११.३० या वेळेत दर्शन सुरू राहील तसेच दु.१२.२० ते १२.३०, दु.२.१० ते ५.३०, सायं.६.४५ ते ७.१० या वेळेत श्रीस पहिले स्नान, महाअभिषेक, अलंकार, महानैवेद्य व धुपारती निमित्त पदस्पर्शदर्शन बंद राहणार आहे. तथापि, श्रींचे मुखदर्शन नेहमीप्रमाणे सुरू राहील.

श्री.विठ्ठलाकडे ११ ब्रम्हवृदांकडून श्रीस रूद्राचा अभिषेक व श्री.रूक्मिणीमातेस ११ ब्रम्हवृंदाकडून पवमान अभिषेक केला जाणार आहे.

# माणूस फाउंडेशन वतीने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून मदतीचा हात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : समाजातील शेवटच्या माणसाच्या उत्कर्षासाठी काम करणारी फक्त संस्था नाही, तर ती एक चळवळ आहे. आपण समाजाचे देणे लागतो त्यामुळे समाजाशी बांधिलकी जपणे ही आपली जबाबदारी आहे. असे अश्वघोष बाबूराव बनसोडे, कोन्हाळीकर यांनी केले

माणूस फाउंडेशन ग्रामीण, शहरी भागातील झोपडपट्ट्या आणि दुर्लक्षित क्षेत्रातील समूहांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण, साक्षरता आणि आरोग्याच्या मुद्द्यांना धरून त्यांचा विकास आणि सक्षमीकरण करण्याचे काम करते. दुर्लक्षित समूहाच्या समान हक्कांसाठी आवाज उठवणे आणि त्यांना दर्जेदार शिक्षण, रोजगार आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे.



यावेळी किरण अहिरे, अखिल पांचाळ, ॲड. महेंद्र बनसोडे, संतोष बनसोडे पोलिस पाटील, संजय बनसोडे, उदय बनसोडे, सुनिल बनसोडे, सत्यजीत बर्वे उपस्थित होते.

# शिक्षणामुळेच व्यक्तीचा ; समाजाचा आणि देशाचा विकास घडतो : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

## भुवनेश्वर मधील कलिंग इन्सटुट ऑफ इंडस्ट्रीयल टेकॉनोलॉजी (किट) विद्यापिठाच्या विद्यार्थ्यांना केले मार्गदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भुवनेश्वर : महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.त्यांनी शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा असा संदेश दिला. शिक्षणामुळे ज्ञानार्जनामुळे व्यक्तीचा विकास होतो.व्यक्तीच्या विकासातुन समाजाचा आणि समाजाच्या विकासातून देशाचा विकास घडतो. शिक्षणामुळे आणि ज्ञानार्जानामुळे व्यक्तीमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन वाढतो. विज्ञान आणि शिक्षणाचा प्रसार केला पाहिजे.गरिबीचा उद्धार शिक्षणातुनच होतो.शिक्षण हे वाघीणीच दुध आहे. जो ते प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.शिक्षणाची कास धरा. शिक्षण आणि विज्ञानाचा प्रसार करा. असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले.

भुवनेश्वर मधील कलिंग इन्सटुट ऑफ इंडस्ट्रीयल टेकॉनोलॉजी (किट)या विद्यापिठाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शना करताना ना.रामदास आठवले बोलत होते.कलिंग विद्यापिठात केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना खास विद्यापिठाने प्रमुख अतिथी म्हणुन निमत्रीत केले होते.कलिंग विद्यापिठाला ना.रामदास आठवले यांनी भेट दिली. कलिंग विद्यापिठातील विद्यार्थ्यांशी संवाद साधुन मार्गदर्शन केले.कलिंग विद्यापिठाचे संस्थापक माजी.खासदार अच्युता सामंता हे उपस्थित होते.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी गोरगरिब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पिपल्स एज्यकेशन सोसायटी ही संस्था १९४५ रोजी स्थापन केली आहे. या पिपल्स एज्यकेशन सोसायटीच्या देशभरातील महाविद्यालयामध्ये लाखो पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत.या संस्थेतून अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले आणि घडले आहेत.

अच्युता सामंत यांनी ही भुवनेश्वर मध्ये कलिंग विद्यापिठ स्थापन करुन शिक्षणाचा प्रसार करण्याचे चांगले काम करित आहेत.या शिक्षण क्षेत्रातील योगदाना बद्दल आपण त्यांचा येत्या २५ जानेवारी २०२६ रोजी दुबई मध्ये महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करणार आहोत.त्या पुरस्कार सोहळ्यात दुबई येथे उपस्थित राहण्याचे निमंत्रण ना.रामदास आठवले यांनी अच्युता सामंता यांना यावेळी जाहिरपणे दिले.

कलिंग विद्यापिठाला ज्या काही अडचणी येतील त्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन ना.रामदास आठवले यांनी यावेळी दिले.विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श घेतला पाहिजे. शिक्षण घेताना विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन ही विकसीत केला पाहिजे



असे आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले.यावेळी ना.रामदास आठवले यांचा भव्य सत्कार कलिंग विद्यापिठाच्या वतीने करण्यात आला.



# ‘वंदे मातरम्’ राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापनदिन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : ‘वंदे मातरम्’ या राष्ट्रीय गीताच्या १५० व्या वर्धापनदिनानिमित्त औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कुर्ला येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७६ मध्ये लिहिलेले ‘वंदे मातरम्’ हे गीत स्वातंत्र्यलढ्याच्या काळात राष्ट्राची प्रेरणा आणि अस्मिता जागवणारे प्रतीक ठरले होते. त्या ऐतिहासिक गीताचे स्मरण, गौरव व आदर व्यक्त करण्यासाठी मुंबई शहर व मुंबई उपनगरातील १२ आयटीआय संस्थांनी संयुक्तपणे हा कार्यक्रम साकारला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ रविंद्र आपटे उपस्थित होते. तसेच राष्ट्र सेविका समितीच्या बौद्धिक प्रमुख डॉ. प्रेरणा क्षीरसागर यांनी प्रमुख वक्त्या म्हणून मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांसमोर ‘वंदे मातरम्’ची ऐतिहासिक पार्श्वभूमी, राष्ट्रीय भावना आणि आजच्या पिढीसाठीचा संदेश प्रभावी शैलीत मांडण्यात आला.सुमारे ५००० विद्यार्थी तसेच ४८० अधिकारी व कर्मचारीवर्ग कार्यक्रमाला उपस्थित होते . मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमाला व्यवसाय प्रशिक्षण अधिकारी विलेश संख्ये तसेच पोलीस अधिकारी शरद शेटे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भाषा शिक्षणतज्ञ रविंद्र आपटे यांनी भूषवले. लोअर परळ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने ‘वंदे मातरम्’च्या भावविश्वावर आधारित संगीत नाट्य सादर केले.

**मुंबई शहर व उपनगरातील १२ आयटीआय संस्थांची संयुक्त सांगता**

# विद्यार्थी दिनाचे औचित्य साधून ग्रामपंचायत किरनळी वतीने स्पोर्टस गणवेश वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : विद्यार्थी दिनाचे औचित्य साधून ग्रामपंचायत किरनाळी तर्फे जिल्हा परिषद शाळा किरनाळी व अंगणवाडीतील सर्व मुलांना स्पोर्टस गणवेश वाटप करण्यात आला व सोबतच सर्व मुलांना स्नेहभोजन देण्यात आले भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी ७ नोव्हेंबर रोजी शाळेत प्रवेश घेतला होता . त्यांच्या स्मरणार्थ संपूर्ण महाराष्ट्रात ७ नोव्हेंबर हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो.



या विद्यार्थी दिनाचे औचित्य साधून ग्रामपंचायत किरनाळी गावचे सरपंच सौ संगीता भंडारे व ग्रामपंचायत मधील सर्व सदस्य यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा किरनाळी मधील सर्व विद्यार्थ्यांना व अंगणवाडीतील सर्व विद्यार्थ्यांना स्पोर्टस गणवेश वाटप केला व सोबतच सर्व मुलांना स्नेहभोजन दिले.

या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री रविकांत हुलगणे, श्री मल्लिनाथ उणदे, श्री पद्माकर भंडारे , श्री अरुण भंडारे, श्री बाळू पांढरे ,श्री रेवप्पा कणमुसे, श्री सिद्धेश्वर सोनकांबळे, श्री परमेश्वर उणदे इत्यादी मान्यवर उपस्थित होते विद्यार्थी दिन साजरा करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्रीम. सुरवसे मॅडम, शाळेतील शिक्षक श्री मनोहर सर, श्री चौगुले सर अंगणवाडीतील सौ . पंचशीला सोनकांबळे व सौ.पटेल मॅडम तसेच भोसले मावशी यांचे सहकार्य लाभले.

# प्रकल्प उदघाटन समारंभात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांचा होणार सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा, जिल्हापरिषद सोलापूर आरोग्यविभाग, जिल्हा शल्यचिक्तिसक कार्यालय सोलापूर, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर, इंडियन रेडक्रॉस सोसायटी शाखा सोलापूर व भारतीय जैन संघटना यांच्यावतीने सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील ४८ पुरग्रस्त गावांमध्ये आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेला इंटरनॅशनल प्लॅन्ड पेरेंटहूड फेडरेशन व ऑस्ट्रेलियन एड यांच्याकडून स्प्रिंट फोर मानवतावादी प्रकल्प मिळाला आहे. पूरग्रस्त गावात मिनिमम इनिशल सर्विस ऑफ पॅकेज अंतर्गत प्रजनन आरोग्याच्या सेवा दिल्या जाणार आहेत. या प्रकल्पाचे उदघाटन सोमवार दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता राम लाल चौकातील हॉटेल निसर्ग एक्झिक्युटिव्ह येथे होणार आहे. या वेळी सलापूर जिल्ह्यात उद्भवलेल्या पूर परिस्थितीत बचावकार्यात उल्लेखनीय कार्य केले व अनेकांचे प्राण वाचविण्यात मोलाचे योगदान दिल्याबद्दल जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूरचे प्रतिनिधी तथा अधिकारी शक्तीसागर ढोले यांचा सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व बुके देऊन गौरव करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया मुंबई मुख्यालयाचे प्रकल्प व्यवस्थापक डॉ. अमित कीटूकले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मोहन शेगर, मुख्यमंत्री सहाय्यता निधी सोलापूर जिल्हा अध्यक्ष डॉ. अविनाश खांडेकर, अक्कलकोट तालुका आरोग्यधिकारी डॉ. अश्विन करजखेडे, माढा तालुका आरोग्यधिकारी डॉ. आरती पटणे, मोहोळ तालुका आरोग्यधिकारी डॉ. अरुण पाथरूडकर, वैद्यकीय अधीक्षक माढा व मोहोळ ग्रामीण रुग्णालय डॉ. विलास मेमाणे, वैद्यकीय अधीक्षक कुर्डुवाडी ग्रामीण रुग्णालय डॉ. एस. एस. रणदिवे, सोलापूर जिल्हापरिषद माध्यम विस्तार अधिकारी धनंजय वाळा, इंडियन रेडक्रॉस सोसायटी शाखा सोलापूरचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, सचिव जयेश पटेल, अक्कलकोट तालुका विस्तार अधिकारी महेश भोरे, एड्स नियंत्रण विभाग जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा सकट, भारतीय जैन संघटनेचे राज्य अध्यक्ष केतनभाई शहा, महिला राज्य प्रमुख कांचनमाला संगवे,



राज्य कार्यकारणी सदस्य श्याम पाटील, विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभूते, विभागीय महिलाध्यक्ष मायाताई पाटील, जिल्हाध्यक्ष देशभूषण वसाळे आदी उपस्थित राहणार आहेत अशी माहिती सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, व्हाइस चेअरपर्सन आयेशा रंगरेज, फायनान्स डव्हायझर सपना चिट्टे, डॉ. विजया महाजन, डॉ. गौरी कहाते व शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी दिली.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात विद्यार्थी दिनानिमित्त कार्यक्रम**

# विद्यार्थ्यांनो स्वदेशीचा पुरस्कार करा, नवराष्ट्राची निर्मिती होईल : प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अद्ययावत तंत्रज्ञानामुळे स्वदेशी वस्तूंची मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली आहे, म्हणून विद्यार्थ्यांनी स्वदेशी वस्तु खरेदीस प्राधान्य द्यावे, त्यामुळे देशाचा जागतिक स्तरावर नवराष्ट्र म्हणून नावलौकिक होईल असे प्रतिपादन प्राचार्य डॉ उमाकांत चनशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विद्यार्थी दिन व वंदेमातरम गीत लेखनास १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, देशहितासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच सामाजिक जाण विकसित केली पाहिजे, आत्मविश्वासाच्या बळावर जीवनावश्यक स्वदेशी वस्तू निर्मितीचे तंत्र अवगत केले



पाहिजे, स्वदेशीचा प्रचार समाजामध्ये करून देशाच्या आर्थिक विकासामध्ये योगदान दिले पाहिजे.

**गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार**

**विद्यार्थी दिनानिमित्त पंचप्पा कल्याणशेट्टी कौशल्य विकास स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्राचार्य डॉ उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला.**

मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, विद्यार्थी हेच देशाचे भावी नागरिक आहेत. तंत्रज्ञान विज्ञान व नव संशोधनामुळे विद्यार्थ्यांची प्रगती झाली आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी देखील देश विकासासाठी नवनवीन संकल्प केले पाहिजेत. विकसित भारताचे स्वप्न साकार केले पाहिजे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, आभार प्रा भीम सोनकांबळे यांनी मानले. कार्यक्रमास कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार, प्रा डॉ शितल झिंगाडे-भस्मे, प्रा हर्षदा गायकवाड, प्रा शिल्पा धूमशेट्टी उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांनी सादर केले वंदेमातरम गीत..**

**वंदेमातरम गीतास १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सामुदायिक संपूर्ण वंदेमातरम गीत सादर केले, मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.**



# श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याच्या स्वीकृत संचालकपदी प्रथमेश पाटील यांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे दिवंगत संचालक प्रकाश भिवाजी पाटील यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या जागेवर त्यांचे सुपुत्र श्री प्रथमेश पाटील त्यांना स्वीकृत सदस्य करण्याचा ठराव आज बहुमताने मंजूर करण्यात आला.

कारखान्याची माजी बैठक कारखानास्थळावर अध्यक्ष शिवानंद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली त्या बैठकीत सर्वांनी मते हा ठराव मंजूर करण्यात आला कारखान्याच्या विद्यमान संचालकाच्या पंचवार्षिक निवडणुकीपूर्वी दिवंगत संचालक प्रकाश पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. कारखान्याचे सभासद सदस्यत्व कायम टिकवण्यापर्यंत त्यांनी न्यायालयीन लढा दिला होता व देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.